**पाहिजेत**
दैनिक अट्टल संकेतसाठी संपूर्ण महाराष्ट्रात वार्ताहर, प्रतिनिधी नेमणे आहेत.
संपर्क - ९६२३४८४४८४

दैनिक
# अट्टल संकेत
ATTAL SANKET

Email : attalsanket2023@gmail.com
www.attalmat.com
RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-२८३ ■ शनिवार, दि. १८ जानेवारी २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये
■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -283 ■ Saturday, 18 Jan 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-

## मुलीचा खून करणाऱ्या आईला जन्मठेप

पुणे : पतीसोबत भांडण झाल्यावर स्वतः चा मुलीचा खून करणाऱ्या आणि नंतर आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या आईला प्रमुख जिल्हा आणि सत्र न्यायाधीश महेंद्र महाजन यांनी जन्मठेप आणि दहा हजार रुपयांची शिक्षा सुनावली.

अनिता संजय साळवे (वय- २५, रा. वारजे, पुणे) असे शिक्षा झालेल्या महिलेचे नाव आहे. आरोपी अनिताचा पती ४ फ्रेब्रुवारी २०१६ रोजी कामावर गेला होता. त्यानंतर अनिताचा पतीशी फ्रोनवर वाद झाला होता. रागाचे भरात तिने स्वत:च्या लहान मुलीचा शालीने नाक तोंड दाबून खून केला. त्यानंतर तिने पंख्याला साडी बांधून गळफ्रास घेण्याचा प्रयत्न केला होता.

याप्रकरणी वारजे पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. वारजे पोलिसांनी तिला अटक केली होती. त्यानंतर तिच्याविरुद्ध न्यायालयात आरोपपत्र दाखल केले. या खटल्यात सरकार पक्षाकडून अतिरिक्त सरकारी वकील मिलिंद दातरंगे यांनी बाजू मांडली. सरकार पक्षाकडून २० साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. कौटुंबिक वादातून पतीने बोलणे सोडलेले होते, तसेच सासूने दुर्लक्ष केले होते. माझ्यामागे लहान मुलीची जबाबदारी कोण स्वीकारणार, तसेच तिची फ्ररफ्रट होऊ नये म्हणून मुलीचा खून करुन आत्महत्येचा प्रयत्न केल्याची कबुली तिने पोलिसांकडे दिली होती.

आरोपीच्या गुन्हेगारी कृत्यामुळे निष्पाप बालकाने जीव गमावला असून, तिला कठोर शिक्षा सुनावण्यात यावी. कौटुंबिक वाद आणि नैराश्यातून तिने मुलीचा खून करुन आत्म हत्येचा प्रयत्न केल्याचे सरकारी वकील दातरंगे यांनी युक्तिवादात सांगितले. तक्रारदाराकडून ॲड. ए. व्ही. औसेकर यांनी बाजू मांडली. बचाव पक्षाकडून ॲड. सचिन झालटे पाटील यांनी काम पाहिले. छळ आणि नैराश्यातून आईने मुलीचा खून केल्याची ही घटना दुर्मीळ असून, आरोपीची पार्श्वभूमी गुन्हेगारी नाही. तिला कमीत कमी शिक्षा देण्यात यावी, अशी विनंती बचाव पक्षाच्या वकिलांनी युक्तिवादात केली. सरकार पक्षाचा युक्तिवाद ग्राह्य धरुन न्यायालयाने आरोपीला जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

# सैफ अली खानच्या मुलाचाच बळी जाणार होता; तो नशिबाने वाचला....

## आमदार जितेंद्र आव्हाड यांचा दावा

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

सैफ राहत्या असलेल्या इमारतीच्या अकराव्या मजल्यावरील शौचालयाच्या खिडकीतून आत शिरलेल्या अज्ञात व्यक्तीने एक कोटी रुपयांची खंडणी मागत केलेल्या हल्ल्यात बॉलिवूड अभिनेता सैफ्र अली खान गंभीर जखमी झाला. हल्लेखोराने सैफवर सहा वार केले असून त्यापैकी दोन जखमा गंभीर होत्या. हल्ला केल्यानंतर पळून गेलेल्या तरुणाचा शोध चालू आहे. या हल्ल्यात सैफसह त्याच्या घरातील दोन महिला कर्मचारीही जखमी झाल्या आहेत.

दरम्यान, सैफ अली खानवर गुरुवारी लीलावती रुग्णालयात शस्त्रक्रिया करण्यात आल्या. त्याची प्रकृती आता स्थिर असून त्याला अतिदक्षता विभागातून विशेष विभागात हालवण्यात आले आहेत. दुसऱ्या बाजूला सैफ्रवर हल्ला करणारा आरोपी अद्याप पोलिसांच्या ताब्यात आलेला नाही. पोलिसांची १० हून अधिक पथकं या आरोपीचा शोध घेत आहेत. दुसऱ्या बाजूला, राज्यातील वाढती गुन्हेगारी, त्याचबरोबर आमदार, नेते व सेलिब्रेटींवरील हल्ल्यांच्या वाढत्या घटना पाहता विरोधी पक्षांनी राज्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या मुद्द्यावरून सरकारला घेरण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. अशातच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार या पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केलेल्या एका दाव्याने खळबळ उडाली आहे.

जितेंद्र आव्हाड यांनी म्हटलं आहे की सैफ अली खानवर प्राणघातक हल्ला होऊन तो बचावला असला तरी हल्लेखोराला सैफ्रचा मुलगा तैमूर याला मारायचं होतं. तैमूरही या हल्ल्यातून बचावला आहे. सत्य कोणीच सांगणार नाही. सत्य सांगायला कोणी पुढे येणार नाही. तैमूरच्या नावामुळे त्याचा द्वेष केला जातो. समाजात एक विकृती पसरली आहे.

आव्हाड यांनी एक्सवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की ङ्गप्राणघातक हल्ल्यातून सैफ अली खान हा नशिबाने बचावला. खरं तर त्याच्या मुलाचाच बळी जाणार होता. मात्र, नशिबाने तोही वाचला.

पण, सत्य बोलण्यास कोणीच धजावत नाही. बाळ जन्माला आले तेव्हा त्याचे नाव तैमूर ठेवण्यात आले. तेव्हापासून सोशल मिडीयाच्या माध्यमातून कट्टरपंथीय या बाळाच्या मागे लागले. कहर म्हणजे या बाळाचे तैमूर हे नाव तैमूरलंग या मंगोल आक्रमकाशी जोडले. सैफ व करीनाचा मुलगा तैमूर हा समाजमाध्यमांमध्ये व जगभरात प्रचंड लोकप्रिय झाला.

> “ आव्हाड म्हणाले, सत्य सांगायला कुणीच पुढे येत नाही. तैमूरचा अरेबिक अर्थ मी आधीच सांगितला आहे. तेव्हा मी स्पष्ट करतो की सत्य मांडून लोकांचे डोळे उघडण्याचा आहे. कल्पनेच्या पलिकडे लहान मुलाची नावावरून कुणाशी तरी तुलना करून त्यास दूषणे लावली जात असतील द्वेष पसरवत असतील तर सर्वच अवघड आहे.



नाव ठेवण्याची आपल्याकडे पूर्वापार पद्धत आहे. ही नावे ठेवताना परंपरा पाहून, प्रथेनुसार ठेवली जात होती. त्यामुळेच आपल्याकडे राम, लक्ष्मण, दशरथ अशी पौराणिक नावे आढळून येतात. तैमूर हे नावदेखील पौराणिकच आहे. त्याचा अरबी भाषेत चांगला अर्थ आहे, ‘लोखंडासारखा कणखर विचारांचा आणि जे काम हाती घेतले आहे, त्या कामाच्या पूर्ततेसाठी ध्यास बाळगणारा!’ असा तैमूरचा अर्थ आहे. त्यातूनच सैफ्र आणि करिना यांनी आपल्या बाळाचे नाव ‘तैमूर’ असे ठेवले. हे नाव जाहीर झाल्यापासूनच तो कट्टरपंथीयांचं लक्ष्य बनला होता. त्याचे नाव तैमूरलंगशी जोडणे ही विकृतीच आहे.

## अश्लिल चाळे थांबविण्यासाठी पोलीस गस्त वाढविण्याची भाजपाची मागणी

नवी मुंबई : सानपाडा सेक्टर दोनमधील परिसरात कॉलेजवयीन युवक-युवतींकडून भर रस्त्यावर सुरु असलेले अश्लिल चाळे बंद करण्यासाठी पोलीस गस्त वाढविण्याची लेखी मागणी भाजयुमाचे माजी नवी मुंबई जिल्हा उपाध्यक्ष आणि अखिल भारतीय माथाडी संघटनेचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष पांडुरंग आमले यांनी सानपाडा पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांकडे एका निवेदनातून केली आहे.

सानपाडा सेक्टर दोनमधील रहिवाशी रस्त्यावर खुलेआमपणे चालणाऱ्या कॉलेज युवक युवतींच्या अश्लिल चाळ्यामुळे त्रस्त झाले आहेत. परिसरातील वेस्टर्न कॉलेजमधील विद्यार्थी सेक्टर दोनमधील अंतर्गत भागात वेस्टर्न कॉलेज, ओपीजी टॉवर ते वात्सल्य ट्रस्ट या रस्त्यावर अश्लिल चाळे करताना पहावयास मिळतात. रस्त्याच्या कडेला, झाडांसभोवताली तसेच चुकीच्या पद्धतीने या ठिकाणी उभ्या असलेल्या अवजड वाहनांच्या पाठीमागील बाजूस या विद्यार्थी विद्यार्थीनीचे अश्लिल चाळे सुरु असतात.

याबाबत रहीवाशांनी या विद्यार्थ्यांना हटकल्यावर रहीवाशांनाच शिवीगाळ करतात, दमदाटी करतात, अंगावर दावून जातात. या रस्त्यावरुन जाताना महिलांना, मुलींना, ज्येष्ठ नागरिकांना माना खाली घालून जावे लागते. या परिसरात पोलीसांची गस्त वाढवावी. जे जे विद्यार्थी अश्लिल चाळे करताना आढळतील त्यांना पोलीस ठाण्यात पकडून आणावे, त्यांच्या पालकांना पोलीस ठाण्यात बोलावून मुले काय उद्योग करतात, याची माहिती द्यावी. या परिसरात सुरु असणारे अश्लिल चाळे बंद करण्यासाठी साध्या वेशातील पोलीस गस्त वाढवण्याची मागणी पांडुरंग आमले यांनी सानपाडा पोलीस ठाण्यातील वरिष्ठ पोलिस निरीक्षकांकडे केली आहे.

## शूटिंगला जात असलेल्या टीव्ही अभिनेत्याचा रस्ते अपघातात मृत्यू

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

टीव्ही मालिका ‘धरतीपुत्र नंदिनी’ फेम अभिनेता अमन जायसवालचा रस्ते अपघातात मृत्यू झाला आहे. हा अभिनेता बाईकवरून शूटिंगसाठी जात होता. यावेळी मुंबईच्या जोगेश्वरी हायवेवर ट्रकने त्याच्या बाईकला टक्कर दिली. यात तो हायवेवर पडला. या अपघातात त्याचा मृत्यू झाला.

अमन जायसवाल हा मूळचा उत्तर प्रदेशातील बलिया येथील होता. तो अभिनेता बनण्याच्या स्वप्नाने मुंबईत आला होता. आपल्या मेहनतीने त्याने आपले स्वप्न पूर्ण केले होते. दरम्यान, या रस्ते अपघातामुळे या अभिनेत्याला कमी वयातच आपले प्राण गमवावे लागले. अमनचे वय केवळ २३ वर्षे इतके होते. २०२३मध्ये नजारा टीव्ही चॅनेलवर धरतीपुत्र नंदिनी ही मालिका सुरू झाली होती. या मध्ये तो पहिल्यांदा मुख्य भूमिकेत होता. याआधी तो उडारिया आणि पुण्यश्लोक अहिल्याबाईक या टीव्हीशोजमध्ये छोट्या मोठ्या भूमिकेत दिसला होता. तो ऑडिशनसाठी होणाऱ्या स्क्रीन टेस्टसाठी शूटिंग करण्यासाठी जात होता. अमनला सुरूवातीपासूनच अभिनेता बनायचे होते. दरम्यान, त्याच्या वडिलांची इच्छा होती की त्याने आयएएस अधिकारी, इंजीनियर अथवा डॉक्टर व्हावे. अमनला त्याच्या आईने साथ दिली होती तसेच वडिलांनाही समजावले होते. अमन अनेकदा आपल्या यशाचे श्रेय आपल्या आईला देत असे.

## एस टी महामंडळाची नव्या बस खरेदीची पंचवार्षिक योजना, दरवर्षी पाच हजार गाड्या खरेदी करणार

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

एस. टी महामंडळ दरवर्षी स्वमालकीच्या पाच हजार साध्या लालपरी बसेस खरेदी करणार आहे. यासाठी महामंडळ पंचवार्षिक नियोजन करणार आहे, तसेच महामंडळात यापुढे कुठल्याही पद्धतीने भाडेतत्त्वावर बसेस न घेण्याचा महत्त्वपूर्ण निर्णयही परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी घेतला.

परिवहन आयुक्त कार्यालयात एसटी महामंडळ कामकाज आढावा बैठक परिवहन मंत्री सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली. बैठकीस एस टी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर यांच्यासह सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

परिवहन मंत्री सरनाईक म्हणाले, नवीन बस खरेदीचा करताना पुढील पाच वर्षात स्क्रॅपिंग (प्रवासी सेवेतून बाद होणाऱ्या) होणाऱ्या बसेसचा विचार करण्यात यावा. याबाबत सर्वांगीण अभ्यास करून पंचवार्षिक योजना आणावी. एस. टी. महामंडळात इलेक्ट्रिक बसेस घेण्यात येत आहे. यासाठी प्रत्येक आगारामध्ये चार्जिंग स्टेशन प्राधान्याने उभारण्यात यावे. महामंडळाने उत्पन्न वाढीसाठी पूरक योजना आणाव्यात. कर्मचाऱ्यांचे वेतन प्रत्येक महिन्याच्या ७ तारखेपर्यंत देण्याची काळजी घेण्यात यावी. पगाराला कुठल्याही परिस्थितीत उशीर होता कामा नये. शासनाकडून महामंडळाला मिळणारा निधी आगाऊ स्वरूपात मिळण्यासाठी प्रस्ताव तयार करण्याच्या सूचनाही दिल्या.

परिवहन मंत्री सरनाईक म्हणाले, एसटी महामंडळाने नवीन जाहिरात धोरण आणावे. नवीन येणाऱ्या बसेसवर दोन्ही बाजूला आणि मागील बाजूस अशा तीनही बाजूला डिजिटल जाहिरातीची व्यवस्था असावी. जाहिरात धोरणासाठी अन्य बाबी तपासून यामधून मिळणारे उत्पन्न १०० कोटीपर्यंत आणण्याचे उद्दिष्टी ठेवण्यात यावे.

महामंडळाच्या बसेसला राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या रस्त्यांवर टोल माफ्री मिळण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात यावा. तसेच डिझेलवरील व्हॅटमध्ये सवलत देण्यासाठी राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा.

एस टी महामंडळाच्या प्रत्येक डेपोमध्ये डिझेल पंप आहे. आता व्यावसायिक दृष्टिकोनातून उपयोगी ठरतील असे डिझेल पंप सुरु करून उत्पन्न वाढीसाठी पर्याय निर्माण करण्यात यावा. याबाबत इंधन कंपन्यांशी करार करावा, अशा सूचनाही परिवहन मंत्री सरनाईक यांनी दिल्या.

## महायुतीत तणाव वाढतोय: बीड जिल्ह्यातील प्रकरणावरून शिंदे गटाच्या मंत्र्याचं मोठं विधान

**बीड (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

संतोष देशमुख हत्येच्या घटनेच्या निषेधार्थ निघालेल्या मोर्चात नेत्यांनी आरोप-प्रत्यारोप केल्यामुळे बीड जिल्ह्यातील राजकारण चांगलंच तापलं आहे.

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर रोजी अपहरण करून हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली होती. या घटनेनंतर महाराष्ट्रात मोठी खळबळ उडाली. या घटनेवरून सर्वच क्षेत्रातून संतप्त प्रतिक्रिया उमटल्या. विधानसभेच्या सभागृहातही या घटनेवरून विरोधकांनी आवाज उठवला होता.

दरम्यान, संतोष देशमुख हत्या प्रकरणात पोलिसांनी आरोपीला अटक केलं. मात्र, अद्यापही एक आरोपी फरार आहे. तसेच खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराडसह हत्या प्रकरणातील आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली. मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आल्यानंतर एसआयटीने वाल्मिक कराडला ताब्यात घेतलं असून पुढील तपास सुरु आहे.

सध्या वाल्मिक कराडला न्यायालयाने २२ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी दिलेली आहे. दुसरीकडे संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मिक कराडचा सहभाग असल्याचा आरोप विरोधक करत आहेत. तसेच वाल्मिक कराड हा राष्ट्र वादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते तथा मंत्री धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय असल्याचा आरोप करण्यात येत आहे. त्यामुळे धनंजय मुंडे यांनी मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी विरोधकांकडून केली जात आहे. यावरून सत्ताधारी आणि विरोधक आमने-सामने आले आहेत. संतोष देशमुख हत्या प्रकरणात भारतीय जनता पक्षाचे आमदार सुरेश धस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे खासदार बजरंग सोनवणे व आमदार संदीप क्षीरसागर यांनी आवाज उठवला.

तसेच राज्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यात संतोष देशमुख हत्येच्या घटनेच्या निषेधार्थ निघालेल्या मोर्चात नेत्यांनी आरोप-प्रत्यारोप केल्यामुळे बीड जिल्ह्यातील राजकारण चांगलंच तापलं. त्यामुळे बीड जिल्हा चांगलाच चर्चेत आहे. दरम्यान, बीड जिल्ह्यातील प्रकरणावरून महायुतीत तणाव वाढत असल्याचं मोठं विधान शिवसेना शिंदे गटाचे नेते तथा मंत्री संजय शिरसाट यांनी केलं. ते साम टिव्ही या वृत्तवाहीनीशी बोलत होते.

संजय शिरसाट काय म्हणाले?

बीड जिल्ह्यातील स्थानिक राजकारण आहे. तेथील राजकारणावर जेवढं बोलावं तेवढं कमी आहे. मात्र, आम्ही स्पष्टपणे सांगितलेलं आहे की ज्या-ज्या पक्षाचे नेते आहेत, त्या पक्षाच्या नेत्यांनी त्या संदर्भात निर्णय घ्यायचा आहे. आता धनंजय मुंडे यांच्याबाबत काय करायचं? ते उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ठरवायचं आहे, तसेच आमदार सुरेश धस यांच्याबाबत काय करायचं ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठरवायचं. आम्ही त्या संदर्भातील निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत नाहीत. आता ते (मुख्यमंत्री देवेंद्र फ्रडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार) वरिष्ठ नेते आहेत त्यामुळे त्यांनी निर्णय घ्यायचा आहे आणि ते जो निर्णय घेतील तो आम्हाला मान्य असेल, असं संजय शिरसाट यांनी म्हटलं आहे. बीड जिल्ह्यात दररोज जी बॅटिंग सुरु आहे, दररोज एकमेकांच्या विरोधात आरोप-प्रत्यारोप सुरु आहेत, त्यामुळे बीड जिल्ह्यात तणाव वाढत आहे आणि हे सत्य आहे. त्यामुळे महायुतीत निश्चित तणाव वाढतोय. पण काय करणार? कारण एक भारतीय जनता पक्षाचे आमदार आहेत आणि एक राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे आम दार आहेत. मात्र, तणाव वाढतोय, याची जाणीव सर्वांनी ठेवली पाहिजेङ्ग, असं मंत्री संजय शिरसाट यांनी म्हटलं आहे.

# मोदींचा गोपनीय मंत्र

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या दणदणीत यशानंतर महायुतीच्या रथाचे घोडे चौखूर उधळणे स्वाभाविक होते. महायुतीच्या घटक पक्षातील राष्ट्रवादी अजित पवार गट आणि शिवसेनेच्या शिंदे गटाचे आमदार अतिउत्साहात येणे साहजिकच होते. परंतु, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुंबईमध्ये आल्यानंतर गोपनीय संवाद कार्यक्रमात महायुतीच्या आमदारांना निमंत्रित केले होते. मोदी यांनी या नवनिर्वाचित आमदारांना आणि राज्यातील ज्येष्ठांनाही गोपनीय मंत्र देण्याचे ठरविले होते. स्वत: मोदी यांनी बैठकीतील कोणतीही चर्चा माध्यमांपर्यंत पोहोचू नये, म्हणून पुरेपूर काळजी घेण्याचे आदेश भाजपच्या महाराष्ट्र शाखेला दिले होते. संवाद बैठकीमध्ये आमदारांना त्यांचा भ्रमणध्वनी नेण्यासही मज्जाव होता. तरीही उत्साही आमदारांनी मोदींचा गोपनीय गुरुमंत्र माध्यमांपर्यंत सविस्तरपणे पोहोचविल्याचे आता स्पष्ट झाले आहे. सकाळी दहा वाजता बैठकीसाठी पोहोचलेल्या आमदारांची शाळा हेडमास्तर मोदी गुरुजींनी घेतली. व्यासपीठावर मोदी यांच्यासह राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दोन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार उपस्थित होते. आमदारांची शाळा घेताना मोदी यांनी सर्वच आमदारांना केंद्र शासनाच्या विविध योजना तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी सातत्याने मतदारसंघात आढावा घेण्याची सूचना केली. या संवाद कार्यक्रमात धनंजय मुंडे आणि छगन भुजबळ हे राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते उपस्थित का नव्हते, याचे नेमके कारण समजू शकले नाही. राष्ट्रवादी काँग्रेसने त्यांच्या काही आमदारांनी अजितदादांची पूर्वपरवानगी घेऊन या महत्त्वाच्या बैठकीला दांडी मारल्याचे स्पष्टीकरण दिले आहे. कदाचित मोदी यांनीच गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या तसेच यापूर्वी घोटाळ्यात अडकलेल्या आमदारांना बैठकीपासून दूर ठेवण्याची सूचना दिली असण्याची शक्यता आहे. काम करीत असताना कुटुंबाकडेदेखील लक्ष देण्याची सूचना मोदींनी केली. घरामध्ये जर वीस वर्षांची मुलगी असेल तर तिलाही काही वेळ द्या, असा कानमंत्र त्यांनी दिला. सार्वजनिक जीवनात कितीही व्यस्त असलात तरी कुटुंबीयांसाठी वेळ दिलाच पाहिजे, ही बाब पंतप्रधानांनी आमदारांच्या निदर्शनास आणली. सर्व कामे करीत असताना आरोग्याकडेही लक्ष द्या आणि त्यासाठी दररोज योग, प्राणायाम जरुर करा, असा प्रेमळ सल्लाही दिला. मोदी यांची ही शाळा वरवर खेळीमेळीची आणि मार्गदर्शन करणारी दिसत असली तरी प्रत्यक्षात आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जिंकणे हेदेखील ध्येय असल्याचे स्पष्ट करण्यात आले. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या राज ठाकरे यांच्याबाबत गौरवोद्गार काढून मोदी यांनी मुंबई महापालिकेच्या निवडणुकीतील विस्तारित महायुतीचे सूतोवाच केले आहे. त्याशिवाय पाच वर्षांनी म्हणजे २०२९ मध्ये राज्यात शतप्रतिशत भाजपची सत्ता यायला हवी, असा कानमंत्रही त्यांनी जाता जाता देवाभाऊंना दिला असावा.

# वाहनांना ३० मार्चपूर्वी ‘हाय सिक्युरिटी’ नंबर प्लेट अनिवार्य !

ठाणे : बनावट नंबर प्लेट लाऊन होणारे गुन्हे, रस्त्यावर धावणारे वाहन नेमके कोणाचे अशा विविध कारणांमुळे वाहनाच्या नंबर प्लेट वरून वाहनाची खरी ओळख पटविण्यासाठी मोठा अडथळा ठरतो आहे, यावर उकल म्हणून राज्य सरकारने सर्व वाहनांना ‘हाय सिक्युरिटी नंबर प्लेट’ बसविणे अनिवार्य केलं आहे. ठाणे प्रादेशिक परिवहन विभागाने याबाबत कडक धोरण अवलंबले असून ३० मार्च २०२५ पर्यंत ठाण्यातील सर्व वाहनांच्या नंबर प्लेट या हाय सिक्युरिटी नंबर प्लेट असणे बंधनकारक रहाणार आहे.

**व्यक्ती इतक्याच वाहनांची संख्या –** ठाण्यात व्यक्ती इतक्याच वाहनांची संख्या असल्याचा आभास होतो. रस्त्यावर धावणारे वाहन नेमके कोणाचे हे देखील समजून येत नाही कधी नंबर प्लेट नसणारी किंवा खोट्या नंबर प्लेट लावून वाहने चालवणाऱ्यांची संख्या कमी नाही. मात्र अशा वाहनांचा कळत नकळत एखादा गुन्हा घडला, तर त्याला शोधणे खूप अवघड होऊन जाते. अशा नंबर प्लेट वरून राष्ट्रीय सुरक्षा देखील धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही. ठण्यसारखी परिस्थिती देशभरात असून याच पार्श्वभूमीवर मा. सर्वोच्च न्यायालयाने सर्व वाहनांना ङ्गहाय सिक्युरिटी नंबर प्लेटङ्ख लावण्याची सूचना केली आहे. या बाबत राज्य शासनाने सुरक्षेच्या दृष्टीने याची गंभीर दखल घेतली आहे. प्रादेशिक परिवहन कार्यालयांना आपल्या अखत्यारीत येणाऱ्या सर्व वाहनांना ३० मार्च २०२५ पूर्वी हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसवून घेण्याचे आवाहन केले असल्याची माहिती ठाणे प्रादेशिक परिवहन अधिकारी हेमांगिनी पाटील यांनी दिली.

प्लेट नसणाऱ्या वाहनांवर दंडात्मक कारवाई

ठाण्यातील १ एप्रिल २०१९ पूर्वी जी वाहने आहेत अशा सर्व वाहनांना हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसवायची आहे. या कामासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालयाने तीन अधिकृत कंपन्यांची नेमणूक केली आहे. अनधिकृत विक्रेत्याकडून अशी नंबर प्लेट बसवून घेतली तर वाहनाची नोंद केंद्र सरकारच्या डेटाबेस मध्ये होणार नाही. यामुळे १ एप्रिल २०२५ नंतर हाय सिक्युरिटी नंबर प्लेट नसणाऱ्या वाहनांवर दंडात्मक कारवाई होऊ शकते असे ठाणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाने सांगितले आहे

# वारकरी संप्रदायास आधुनिक रुप दाते संत!

**मघेतलेल्या शिष्यत्वाच्या परीक्षेत आबाजी उत्तीर्ण झाले. म्हणून गुरू माणिकबाबांनी त्यांना अनुग्रह दिला आणि गुरूपदेश केला. नंतर गुरूंनी त्यांचे नाव भगवान ठेवले. त्यांचे पुण्यस्मरण करून श्रीकृष्णदास निरंकारी– बापू यांनी लेखरूपाने लिहिलेली ही रोचक माहिती... संपादक**

### १८-२५ जानेवारी: संत भगवानबाबा स्मृतिदिन सप्ताह विशेष

संतश्रेष्ठ भगवानबाबांनी महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात कीर्तनाच्या माध्यमातून शैक्षणिक, सामाजिक, नैतिक व सांस्कृतिक प्रबोधन केले. भक्तिमार्ग, कर्ममार्ग व ज्ञानमार्ग यांचा त्रिवेणी समन्वय त्यांनी साधला होता. तो त्यांच्या कीर्तनातही दिसून येई. कीर्तनकार म्हणून त्यांना प्रचंड लोकप्रियता मिळाली होती. आपल्या कीर्तनांतून ते जातिभेद, धर्मभेद, अज्ञान, अंधश्रद्धा, अनिष्ट रुढी-परंपरा यांच्यावर प्रहार करीत. प्रबोधन कार्यासाठी त्यांनी मराठवाडा, विदर्भ, तेलंगाणा, आंध्रप्रदेश, कर्नाटकातील काही भाग व पश्चिम महाराष्ट्रासह उभा महाराष्ट्र पिंजून काढला. विठूनामाचा प्रचार करतानाच त्यांनी समता, बंधुता, एकता, मानवता यांसारख्या आधुनिक विचारांचा आयुष्यभर प्रचार केला. त्यामुळेच वारकरी संप्रदायाला आधुनिक रूप देणारे संत म्हणून त्यांना ओळखले जाते. त्यांनी वार्षिक नारळी सप्ताहाची स्थापना केली.




आबाजींचे पूर्वज हे लहानपणापासून नारायणगडाचे उपासक होते. तेथील महंत हे त्यांचे वंशपरंपरागत गुरू होते व तत्कालीन गादीवर माणिकबाबा होते. आबाजींचे आईवडील नेमाने माणिकबाबांच्या दर्शनासाठी नारायणगडावर येत. एकदा आईवडील त्यांना घेऊन विजयादशमीच्या दिवशी तेथे आले. आबाजींनी माणिकबाबांना ‘गुरूपदेश द्या‘ असे म्हटले. त्यावर अल्पवयात गुरूपदेश देता येत नाही असे माणिकबाबा म्हणाले. पण त्यांच्या मनाचे समाधान झाले नाही. घेतलेल्या शिष्यत्वाच्या परीक्षेत आबाजी उत्तीर्ण झाले. म्हणून माणिकबाबांनी त्यांना अनुग्रह दिला आणि गुरूपदेश केला. नंतर गुरूजींनी त्यांचे नाव भगवान ठेवले. असे म्हटले जाते, की पंढरपुरला गेल्यानंतर तेथेच त्यांची भेट नारायणगड येथील माणिकबाबांशी झाली व ते सांप्रदायिक शिक्षणासाठी नारायणगडी गेले. माणिकबाबा हे त्यांचे गुरू होय. त्यानंतर भगवानबाबा पुढील शिक्षणासाठी आळंदीतील बंकट स्वामी यांच्याकडे गेले. त्यानंतर ते पुन्हा नारायणगडावर आले. त्यावेळी भगवानबाबांचे वय २१ वर्षे होते. त्यानंतर भगवानबाबा नारायणगडाचे महंत झाले व त्यांनी तेथे वारी, नारळी सप्ताह असे अनेक धार्मिक कार्यक्रम राबवले.

बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यांत सुपेघाट सावरगाव येथे श्रावण वद्य पंचमी शके १८१८ म्हणजेच दि.२९ जुलै १८९६ रोजी संतशिरोमणी भगवानबाबा यांचा जन्म झाला. बारशाच्यावेळी मुलाचे नाव आबा किंवा आबाजी ठेवण्यात आले. त्यामुळे भगवानबाबांचे पूर्ण नाव आबाजी तुबाजी सानप होते. ते कौतिकाबाई आणि तुबाजीराव यांचे पाचवे अपत्य होते. सावरगावात चौथीपर्यंत शाळा होती. तेव्हा गुरुजींच्या सांगण्यावरुन पुढील शिक्षणासाठी त्यांना त्यांच्या मामाच्या गावी लोणी, ता.शिरूर, जि.बीड येथे पाठवले गेले. अधिक शिक्षणसोयी नसल्याने आबाजी पुन्हा गावाकडे परत आले. ग्रामीण भागात रीती रिवाजानुसार गुरेढोरे राखायला ते जात असत. आबाजीला शेती व गुरांची निगराणी राखायला फक्कार आवडत असे. घरात धार्मिक वातावरण असल्यामुळे उपजतच त्यांना अध्यात्माची व विठ्ठलनामाची आवड निर्माण झाली. ते घरी शेतीकाम सांभाळून विठ्ठलभक्ती करत असत. त्यांनी पंढरपूर दिंडीत जाण्यास सुरुवात केली. दिघूळ येथील प्रख्यात वारकरी गितेबाबांसोबत ते प्रथम दिंडीस गेले. पंढरपूरच्या विठ्ठलाचे दर्शन झाले तर जीवनाचे कल्याण होते, अशी त्यांच्या परिवारात आणि आसपासच्या समाजात समजूत होती. त्यामुळे त्यांनी गीतेबाबा दिघुळकरांसोबत पंढरपूरची वारी केली. त्यासाठी ते वयाच्या ५-६व्या वर्षी घर सोडून पायी चालत गेले. पहिल्या वारीच्या शेवटीच तेथे पोहोचल्यावर त्यांनी संपूर्ण जीवन विठ्ठलचरणी अर्पण केले. त्यांनी गीतेबाबांनाच आध्यात्मिक गुरू मानले. पंढरपूरच्या वारीवरून गावी परतल्यावर आबाजी घरी परत गेले नाही.



– संकलन व शब्दांकन –
श्री एन. के. कुमार
जी. से.नि.अध्यापक.
गडचिरोली मोबा–
७७७५०४१०८६.

गावातील हनुमान मंदिरात जाऊन बसले. घरच्यांना ही बातमी कळताच ते मंदिरात आले. तेव्हा त्यांनी तुळशीमाळ घालण्याचा आग्रह केला. लहान आबाजींचे भगवंताविषयी असलेले प्रेम पाहून घरच्यांनी आग्रह स्वीकारला. तेव्हाच ते घरी परत आले.

अनेक वर्षे बाबांची कीर्तन कारणाने भ्रमंती सुरू असताना त्यांनी समाजाचे जवळून निरीक्षण केले, अभ्यास केला. समाजाचे विदारक चित्र पाहून त्यावर बाबांनी कीर्तनाद्वारे समाजप्रबोधन केले. समाजातील अनेक वाईट प्रथा व चालीरीती बंद करण्याचा प्रयत्न केला. अंध:कारातून प्रकाशाकडे जाणारा मार्ग बाबांनी सांगितला. इ.स. १९६५ च्या प्रारंभी भगवानबाबांची प्रकृती खालावत चालली होती. अनेक दिवसांपासून त्यांच्या प्रकृतीत चढ उतार होत होते, त्यांची प्रकृती आणखी खालावली व प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना पुणे जिल्ह्यातील रुबी हॉल क्लिनिक येथे औषधपाण्याकरिता दाखल केले. संतश्रेष्ठ भगवानबाबा हृदयविकाराने आजारी असताना उपचार करण्यासाठी रुबी हॉल क्लिनिक इस्पितळातील डॉ.के. बी.ग्रँट व त्यांची टीम दाखल झाली. त्यांच्या विनंतीला मान देऊन नाथा मिसाळ हे ज्ञानेश्वरीचे पारायण करत असत. तेथेच दि.१८ जानेवारी १९६५ रोजी वयाच्या ६९व्या वर्षी समाधीस्थ होऊन जगाचा निरोप घेतला. तीन वेळा त्यांनी ‘पुंडलीक वरदा हरी विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम, पंढरीनाथ महाराज की जय, जगद्गुरू तुकाराम महाराज की जय, शांतिब्रह्म श्री एकनाथ महाराज की जय!‘ असा जयघोष करून आत्मा पांडुरंगचरणी विलीन केला व देह ठेवला.

!! भगवान बाबांना त्यांच्या पावन पुण्यस्मरण पर्वावर विनम्र अभिवादन !!

# स्टार्टअप इंडिया : इकोसिस्टमला प्रोत्साहन

**स्टँड–अप** इंडिया ही योजना महिला आणि अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती समुदायातील उद्योजकतेला पाठिंबा देण्यासाठी ५ एप्रिल २०१६ रोजी भारत सरकारने सुरू केली. हे स्टार्टअप इंडिया सामान आहे पण या योजनेचे भाग नाही. या दोनही योजना मेक इन इंडिया, इंडस्ट्रियल कॉरिडोर, डेडिकेटेड फ्रेट कॉरिडोर, सागरमाला, भारतमाला, उडान–आरसीएस, डिजिटल इंडिया, भारतनेट आणि उमंग या भारत सरकारच्या इतर योजनांचे समर्थक व लाभार्थी आहेत. या योजनेअंतर्गत अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती आणि महिला दरम्यान १० लाख आणि १ कोटी योजना ऑफ्फर बँक कर्ज शेती क्षेत्राचा बाहेर नवीन उपक्रम सेट चा समावेश आहे.

स्टार्टअप म्हणजे अशी संस्था ज्याचे मुख्यालय भारतात आहे, १० वर्षांपूर्वी उघडले गेले आहे आणि ज्याची वार्षिक उलाढाल १०० कोटी पेक्षा कमी आहे. या योजनेसाठी सुरुवातीला २०००० कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. स्टार्टअप इंडिया उपक्रम ंतर्गत, इनक्यूबेटर फ्फ्रेमवर्कचा उद्देश भारतातील स्टार्टअप्सच्या वाढीसाठी पायाभूत सुविधा, मार्गदर्शन आणि आर्थिक सहाय्य यासारखी आवश्यक संसाधने प्रदान करणे आहे. भारतात ४०० हून अधिक इनक्यूबेटर आहेत, त्यापैकी बहुतेक सुरुवातीचा टप्पा. स्टार्टअप इंडियाचे उद्दिष्ट विद्यमान इनक्यूबेटरच्या क्षमता वाढवणे आणि नवीन इनक्यूबेटर स्थापित करण्यासाठी समर्थन प्रदान करणे आहे. स्टार्टअप इंडियाकडून स्टार्टअप इनक्यूबेटर म्हणून मान्यता मिळाल्याने, स्टार्टअप्सना आर्थिक प्रोत्साहने, कर लाभ आणि सरकारी मदत असे विविध फ्फायदे मिळू शकतात. स्टार्टअप इंडियाचे इनक्युबेशन पार्टनर बनण्यासाठी, संस्थांना सरकारी नियमांचे पालन करून अर्ज करणे आवश्यक आहे आणि संस्था अनुदान, मार्गदर्शन, नेटवर्क आणि भांडवल यासारख्या आवश्यक संसाधनांद्वारे स्टार्टअप्सना सक्षम करण्यासाठी काम करतात. या उपक्रमाशी संबंधित एक अतिरिक्त क्षेत्र म्हणजे या क्षेत्रातील प्रतिबंधात्मक राज्य सरकारच्या धोरणांना काढून टाकणे, जसे की परवाना राज, जमीन, परदेशी गुंतवणूक प्रस्ताव आणि पर्यावरणीय मंजुरी यांच्याशी संबंधित धोरणे. हे उद्योग आणि अंतर्गत व्यापार संवर्धन विभाग – औद्योगिक धोरण आणि प्रोत्साहन विभागाने आयोजित केले होते.

या योजनेचा उद्देश भारतात उत्पादन, वाहतूक, ऊर्जा, आरोग्य, शिक्षण, शेती, पाणी, स्वच्छता इत्यादी विशिष्ट क्षेत्रांमध्ये स्टार्टअप्सना समर्थन आणि प्रोत्साहन देणारी इनक्यूबेशन सेंटर्स स्थापित करणे आणि त्यांना आवश्यक पायाभूत सुविधा प्रदान करणे हा आहे. पायाभूत सुविधा आणि इतर मूल्यवर्धित सेवा प्रदान करा. समावेशक विकासाला पाठिंबा देण्यासाठी अविकसित आणि वंचित प्रदेशांमध्ये अटल इनक्युबेशन सेंटर स्थापन करण्यावर देखील या योजनेचा भर असेल.

अधिक माहिती आणि तपशीलवार वर्णनासाठी, तुम्ही इनक्युबेटर फ्फ्रेमवर्क पृष्ठाला भेट देऊ शकता. स्टार्टअप इंडिया इनिशिएटिव्ह ही एक सरकारी उपक्रम आहे ज्याचा उद्देश भारतीय स्टार्टअप इकोसिस्टमला प्रोत्साहन देणे आणि पाठिंबा देणे आहे. या प्रक्रियेत इनक्युबेशन पार्टनर्स महत्त्वाची भूमिका बजावतात. इनक्युबेशन पार्टनर ही एक संस्था किंवा संस्था आहे जी स्टार्टअप्सना ऑपरेशनल, तांत्रिक आणि व्यवसाय समर्थन प्रदान करते.

स्टार्टअप इंडियामध्ये सामील होण्याच्या प्रक्रियेत स्टार्टअप इंडिया पोर्टलवर नोंदणी करणे, स्टार्टअप माहिती, उद्दिष्ट आणि कार्यक्षेत्र असलेले अर्ज भरणे, इनक्यूबेटर प्रोग्रामसाठी संपूर्ण आणि तपशीलवार प्रकल्प अहवाल (व्यवसाय प्रस्ताव) सादर करणे ई. पायऱ्या असतात. तसेच, अर्जदार संस्था संलग्न स्टार्टअप इनक्यूबेटर असणे आवश्यक आहे, तांत्रिक किंवा व्यवसायिक सहाय्य प्रदान करण्याचा अनुभव आणि क्षमता आवश्यक आहे. भारतीय स्टार्टअप इकोसिस्टमला बळकटी देण्यासाठी कायदेशीर नोंदणी आणि इतर औपचारिकता पात्रतेच्या निकषाकरीता आवश्यक आहेत. इनक्यूबेटर निवड प्रक्रियेचा उद्देश अशा संस्थांची ओळख पटवणे आहे जे स्टार्टअप्सना चांगली संसाधने आणि संधी प्रदान करू शकतात. इनक्यूबेटरचे नेटवर्क किती मोठे आणि प्रभावी आहे हे विचारात घेतले जाते. व्यावसायिक प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि समुपदेशन, तंत्रज्ञान, सुविधा आणि कामाच्या जागेची उपलब्धता, सरकारी सहाय्य कार्यक्रमांचे धोरणात्मक सूचना आणि फ्फायदे, आर्थिक आणि गैर–आर्थिक प्रोत्साहने, सक्षम इनक्यूबेटर ते स्टार्टअप्सना भांडवली गुंतवणूक, योग्य संसाधने, गुंतवणूकदार नेटवर्क आणि इतर व्यवसाय–संबंधित समर्थन प्रदान करतात. सर्व स्टार्टअप उद्योजकांना स्टार्टअप दिनाच्या शुभेच्छा!

**– प्रविण बागडे, नागपूर**
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९
ई–मेल : pravinbagde@gmail.com

# महाकुंभचे निमित्त साधत विहिंपच्या बैठका, मंदिरांवरील सरकारी नियंत्रण हटवणे व मशिदींवरील दाव्यांबाबत मोर्चेबांधणी

**कुंभ** मेळ्याचं निमित्त साधत विश्व हिंदू परिषद त्यांची धोरणं पुढे रेटण्यासाठी हिंदू साधू–संतांच्या बैठका घेत आहे.

उत्तर प्रदेशमधील प्रयागराजमध्ये सध्या महाकुंभ मेळा चालू आहे. दरम्यान, या मेळ्यासाठी आलेल्या साधूंच्या काही बैठका नुकत्याच पार पडल्या आहेत आणि काही बैठका पुढील काही दिवसांमध्ये होत आहेत. या बैठकांमध्ये काही धार्मिक व राजकीय विषयांवर चर्चा झाली. मंदिरांना सरकारी नियंत्रणातून मुक्त करणे व मुस्लीम वास्तूंवरील हिंदू संघटनांच्या दाव्यांसंबंधीच्या मुद्यांवर चर्चा झाली.

संभलमधील मशीद व अजमेर दर्गा हिंदूंची मंदिरं तोडून उभारल्याचा दावा हिंदू संघटनांनी केला आहे. याविषयी पुढील चर्चेसाठी विश्व हिंदू परिषदेने २४ ते २७ जानेवारी दरम्यान प्रयागराजमध्ये देशभरातील हिंदू अध्यात्मिक गुरू व साधूंचा समावेश असलेल्या मार्गदर्शक मंडळाची बैठक आयोजित केली आहे. मंदिरं सरकारी नियंत्रणातून मुक्त करणे हा विश्व हिंदू परिषदेचा प्रमुख अजेंडा असल्याचं सांगितलं जात आहे. यासाठी देशव्यापी मोहीम आयोजित करण्याची तयारी विहिंपने सुरू केली आहे. या मार्गदर्शक मंडळाच्या बैठकीत सहभागी होणारे प्रतिनिधी त्यांचे स्वतःचे व हिंदू समाजाशी संबंधित मुद्दे उपस्थित करतील. हिंदू समाजातील इतर प्रतिनिधिंनी इतर समकालीन मुद्दे देखील उपस्थित केले आहेत. त्यावरही पुढील बैठकांमध्ये चर्चा होऊ शकते, असं विहिंपचे प्रवक्ते विनोद बन्सल यांनी दी इंडियन एक्सप्रेसला सांगितलं.

### हिंदुत्वाचा कार्यक्रम तळागाळात नेण्याविषयी चर्चा होणार

विहिंपचे विनोद बन्सल म्हणाले, कुंभमेळा हे सामाजिक सलोख्याचं एक उदाहरण आहे. सर्व स्तरातील, वेगवेगळ्या जातींचे, वेगवेगळ्या समुदायांचे लोक सर्व मतभेद विसरून गंगेच्या पवित्र पाण्यात स्नान करण्यासाठी एकत्र येतात. आपल्या वसाहतवादी भूतकाळातील जातीय व्यवस्था व अस्पृष्यता मागे टाकून एक मजबूत व संयुक्त राष्ट्र बनवण्याची वेळ आली आहेङ्ख. दरम्यान, सूत्रांनी सांगितलं की विहिंपच्या बैठकांमध्ये हिंदुत्वाचा कार्यक्रम तळागाळात नेण्याविषयी चर्चा होईल. तो देखील विहिंपचा अजेंडा आहे.

विनोद बन्सल म्हणाले, मार्गदर्शक मंडळाच्या बैठकीनंतर विश्व हिंदू परिषदेच्या प्रन्यास मंडळाची बैठक होईल.

मार्गदर्शक मंडळाच्या बैठकीत ज्या सूचना केल्या जातील त्या पुढे नेण्याचं काम प्रन्यास मंडळाच्या बैठकीतून होईल. सूचनांची अंमलबजावणी कशी करायची यावरही चर्चा होईल.

दरम्यान, या बैठकीला देशभरातील शेकडो साधूसंत उपस्थित राहण्याची अपेक्षा बन्सल यांनी व्यक्त केली आहे. बैठकीच्या पहिल्या दिवशी प्रमुख मार्गदर्शक, दुसऱ्या दिवशी साध्वी, तिसऱ्या दिवशी संत व चौथ्या दिवशी तरुण साधू उपस्थित राहतील. साधूसंत अजेंडा ठरवतात व विश्वस्त मंडळ त्याची अंमलबजावणी करतात. बांगलादेशमधील सध्याची स्थिती, लव्ह जिहाद, हिंदूंची घरवापसी व धर्मांतराच्या मुद्द्यांवरही या बैठकांमध्ये चर्चा होऊ शकते, असं बन्सल यांनी सांगितलं.

विश्व हिंदू परिषदेची उद्दीष्ट काय?

जातीभेद ओलांडून हिंदू एकतेला प्रोत्साहन देणे हा या बैठकीतील प्रमुख अजेंडा असल्याचं सूत्रांनी सांगितलं आहे. हिंदुत्ववादी संघटनांचं म्हणणं आहे की देशातील विरोधी पक्ष सातत्याने हिंदूत्वविरोधी कारवाया करत आहे. त्याविरोधात हिंदू साधूसंत काय करू शकतात यावरही चर्चा होऊ शकते. ङ्गअनेक वर्षांपासून हिंदू संघटना राम मंदिर बांधण्यासाठी आग्रही होत्या.

आता राम मंदिर बांधण्याचं ध्येय पूर्ण झालं आहे. आता प्रत्येक घरांत राम पोहोचवणं हे आमचं ध्येय आहे, असं बन्सल यांनी सांगितलं. देशात सामाजिक सलोखा निर्माण करणे हे देखील आमचं उद्दीष्ट आहे. कुंभमेळ्याद्वारे हा सलोखा निर्माण करता येईल असं आम्हाला वाटतं, असं बन्सल म्हणाले.

# आर्थिक सक्षमीकरणामुळे महिलांची प्रगती-जिल्हाधिकारी दिलीप स्वामी



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

बचत गटाच्या महिला मोठ्या कष्ट आणि जिद्दीने सर्व अडचणींवर मात करुन यश मिळवित आहेत. त्यातून त्यांचे आर्थिक सक्षमीकरण होत आहे. आता या महिलांनी संक्रांतीच्या पर्वावर आत्मविश्वास आणि प्रोत्साहनाचे वाण वाटावे आणि आपल्या इतर भगिनींचीही प्रगती साधावी. महिलांची प्रगती ही पर्यायाने समाजाची आणि देशाची प्रगती होय, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज येथे केले.

राज्यस्तरीय मिनी सरस २०२५ या महिला बचत गटांनी उत्पादीत वस्तू व मालाचे प्रदर्शन जिल्हा परिषद मैदानावर सुरु असून या प्रदर्शनाचे उद्घाटन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते करण्यात आले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक अशोक सिरसे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राघवेंद्र घोरपडे, सहायक प्रकल्प संचालक उल्हास खळेगावकर, जिल्हा अभियान व्यवस्थापक विक्रम सरगर, व्यवस्थापक विपणन सचिन सोनवणे, जिल्हा व्यवस्थापक विभीषण भोईटे, जिल्हा व्यवस्थापक सुचिता खोतकर, जिल्हा व्यवस्थापक प्रज्ञा दाभाडे, सतिष औरंगाबादकर आदी उपस्थित होते. प्रकल्प संचालक अशोक सिरसे यांनी प्रास्ताविकात माहिती दिली की, या प्रदर्शनात १२ जिल्हे सहभागी झालेले असून ९३ स्टॉल्स आहेत. महाराष्ट्र राज्य ग्रामिण जीवनोन्नती अभियान , महिला आर्थिक विकास महामंडळ, राष्ट्रीय शहरी विकास अभियान, आत्मा अशा विविध संस्थांमार्फत आलेले बचत गट यात सहभागी झाले आहेत. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानअंतर्गत जिल्ह्यात एकूण १८ हजार ५२५ स्वयंसहायता समूह स्थापन आहेत. त्यात २ लाख ०२ हजार ५०२ कुटुंबांचा समावेश होतो.या समुहांचे ९२७ ग्रामसंघ असून ६१ प्रभाग संघ आहेत. ३० कोटी रुपयांचे खेळते भांडवल असून ९०३ कोटी रुपयांचा निधी बँकांमार्फत देण्यात आला आहे. या महिला बचत गटांनी सेंद्रीय शेती, शेतकरी उत्पादक कंपन्या, सामाजिक सहाय्यता योजना यांच्याशी संलग्न काम करीत आहेत. ऑनलाईन मार्केटींग मध्येही या महिलांची उत्पादने आली असून आता विमासखी म्हणून या महिला विमा क्षेत्रात येत आहेत. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना म्हणाले की, महिला बचत गटांचे काम आणि त्यांच्या उत्पादनांची गुणवत्ता वाखाणण्यासारखी आहे. आता उत्पादन करुन विक्री करण्यासोबतच बचत गटांना सेवा क्षेत्रात, केटरींग व्यवसाय, घनकचरा व्यवस्थापन अशा विविध क्षेत्रात संधी उपलब्ध करुन देण्याच्या उपाययोजना सुरु आहेत. प्रत्येक कुटुंबात लखपती दिदी तयार करण्यासोबतच आता बचतगटाच्या महिलांनी विविध सामाजिक प्रश्नांवरही सामाजिक क्रांतीचे अग्रदूत म्हणून काम करावे. जिल्ह्यातील घटते लिंग गुणोत्तर प्रमाण, बालविवाह या सारख्या प्रश्नावर सामाजिक भुमिका घेऊन गावपातळीवर काम करावे,असे आवाहनही त्यांनी केले. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी सांगितले की, महिलांना प्रगती करतांना घरापासून किंवा घरातूनच अडचणींचा सामना करावा लागतो. अशावेळी आपण मोठ्या जिद्दीने आणि कष्टाने त्यावर मात करुन इतकी प्रगती साध्य केली आहे. ही अभिमानाची बाब आहे. आपली ही प्रेरणा आणि जिद्दीची संक्रांतीचे वाण म्हणून वाटावी. महिलांचे आर्थिक सक्षमीकरण होणे आवश्यक असून त्याद्वारेच समाजाचा आणि देशाची प्रगती होईल. सामाजिक प्रश्नांवर महिलांनी सदिच्छादूत म्हणून काम करावे,असे आवाहनही त्यांनी केले. सूत्रसंचालन प्रशांत जोशी यांनी केले.

# बुद्ध धम्माची शिकवण अंगिकारून जागतिक शांततेसाठी मानवी मूल्यांची जोपासना करा - केंद्रीय मंत्री रामदास आठवले

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**



लोकुत्तरा महाविहार चौका येथे अखिल भारतीय भिक्खु संघाचे अनुसंघनायक लोकुत्तरा महाविहाराचे संस्थापक अध्यक्ष भदंत बोधिपालो महाथेरो यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १४ जानेवारी रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे भूमिपूजन सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण केंद्रीय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांच्या हस्ते तसेच फुलंब्री विधानसभा आमदार अनुराधाताई चव्हाण उपस्थितीत संपन्न झाले. ना.रामदास आठवले यांचे स्वागत संस्थेचे विश्वस्त आर. आर. लेमाडे यांनी केले . धम्म पीठावर भदंत बोधीपालो महाथेरो, भदंत कश्यप महाथेरो, भंते धम्मानंद थेरो, भंते कुलदीप,भंते विनयशील, भंते धम्मरतन,भंते उपाली आदींसह भिक्खू संघाची उपस्थिती होती.यावेळी रामदास आठवले यांनी मानवी जीवनात बुद्ध धम्माचे महत्व आणि योगदान सांगितले.ते म्हणाले बुद्ध,धम्म आणि संघ हा मानवी कल्याणाचा धम्म आहे. कलिंगाच्या युद्धामध्ये झालेला रक्तसंहार पाहून सम्राट अशोकाने शस्त्राचा त्याग करुन या जंबुद्विपामध्ये बुद्ध, धम्म, संघाला शरण येऊन शांती प्रस्थापित करण्यासाठी महत्त्वाचे कार्य केले. तसेच स्वत:मध्ये अंतरिक शांतता प्रस्थापित केली. प्रत्येकाने आपल्यामध्ये बुद्ध, धम्म, संघाची शिकवण अंगीकारून खऱ्या मानवी मूल्यांची जोपासना केली पाहिजे. जगातील आजच्या अशांत परिस्थितीत बुद्ध धम्माची शिकवनच शांतता प्रस्थापित करु शकते. बुद्ध धम्म हा धर्म नसून धम्म आहे तो जात पात पंथ प्रांत अशी कुठल्याही विषमतेपलीकडचा आहे. तो समतेचा पुरस्कार करतो. ह्या प्रसंगी त्यांनी लोकुत्तरा प्रतिष्ठानच्या विविध उपक्रमाची प्रशंसा केली आणि ह्या कल्याणकारी कामासाठी सर्वतोपरी सहकार्य करुन सर्व प्रकारे मदत करण्याचे आश्वासन दिले. त्यांनी या परिसरामध्ये होत असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासाठी तसेच लोकुत्तरा प्रतिष्ठानच्या उर्वरित प्रकल्पाच्या विकासासाठी सढळ हाताने योगदान देण्याचे जाहीर केले. यावेळी आमदार अनुराधाताई चव्हाण यांनी आपल्याच मतदारसंघातील या प्रकल्पास सर्वोत्परी मदत करण्याचे आश्वासित केले. त्यांनी खूप समाधान व्यक्त केले की, एवढा सुंदर प्रकल्प चौका येथे लोकुत्तरा भूमीमध्ये साकारला जात आहे ही अभिमानाची बाब आहे. भदंत बोधिपालो महाथेरो यांनी लोकुत्तरा मिशनच्या विविध उपक्रमाची आणि आत्तापर्यंत पूर्णत्वास आलेल्या प्रकल्पांची माहिती सांगितली लोकुत्तरा महविहाराचे संस्थापक सचिव भदंत काश्यप महाथेरो यांनी प्रास्ताविक केले. लोकुत्तरा महविहाराच्या वतीने मंदाकिनी लेमाडे,संगिता पाखरे यांनी वतीने उपस्थितांचे आभार मानले. यावेळी बाबुराव कदम, मिलिंद शेळके, बाळकृष्ण इंगळे, दत्तू साळवे, जे.पी. शेजवळ, विजय मगरे, संजय ठोकळ, डॉ.के.बी. हिवराळे,संजय मोरे, जितेंद्र बाबा जयस्वाल, राजेंद्र जयस्वाल, कल्याणदादा चव्हाण, अमोल चव्हाण, रूपचंद साळवे, रबीब मौलाना,सतीश लकडे, पंडितराव जाधव, पी.आय शहाणे, अंबादासजी वाघ, चंद्रकलाबाई पवार,संदीप गोमटे, संतोष वाघ, मंदाकिनी लेमाडे,संगिता पाखरे, सुधा लेमाडे,उज्वला खडसे, नरवाडे आई, निर्मला गवई, डी जे वाकोडे, राजेंद्र नन्नावरे, आर.ओ.इंगळे, प्रभाकर झिने, मकरंद नन्नावरे,अनिल साळवे, गुंजाळ उपसरपंच, शेख पठाण, सुधाकर झिने, स्मृती लेमाडे,अनिल साळवे आदींसह शहरातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# जात वैधता सादर करण्यास नव्याने तीन महिने मुदतवाढ मंजुर-अभ्यासक राजेंद्र दाते पाटील

## ३६ पैकी फक्त १४ ठिकाणीच अध्यक्ष

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

नियमीत पडताळणी समिती स्थापना करून एस ई बी सी आणि ओबीसी जात पडताळणी साठी नव्याने किमान तीन महिन्याची मुदत वाढ द्यावी अशी मागणी सातत्याने मुख्यमंत्र्याकडे जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी लाऊन धरली होती त्या अनुषंगाने पहिली मुदत वाढ आमच्या मागणी प्रमाणे या पुर्वी ५ सप्टेंबर २०२४ रोजी शासनाचा आदेश अन्वये मिळाली होती.

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाने नुकताच एक शासन निर्णय काढला असुन यापुर्वी सुद्धा जेष्ठ अभ्यासक डॉ. राजेंद्र दाते पाटील यांच्या पाठपुराव्या मुळे सहा महिने मुदतवाढ मिळाली होती आणि सद्य स्थितीत सुद्धा त्यांचेच पाठपुराव्या मुळे सदर जात वैधता प्रमाणपत्र सादर करू न शकलेल्या समस्त उमेदवारांचे शैक्षणिक हित लक्षात घेता शासनाने राज्यात सध्या सुरू असलेल्या सन २०२४-२५ मधील विविध शैक्षणिक संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशा साठी (अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमां सहित) एसईबीसी व ओबीसी प्रवर्गातील ज्या उमेदवारांचे प्रवेश निश्चित झालेले आहे परंतु विहित कालावधीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करू शकलेले नाहीत,अशा उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास अधिकचा तीन महिन्यांचा कालावधी देण्यात आलेला असुन सदरचा अधिकचा तीन महिन्यांचा कालावधी हा एस.ई.बी.सी व ओबीसी प्रवर्गातील ज्या उमेदवारांचे प्रवेश निश्चित झालेले आहेत परंतु जात वैधता प्रमाणपत्र विहित वेळेत सादर करू शकले नाहीत केवळ अशा उमेदवारा साठीच राहील. तसेच जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास सदर तीन महिन्यांचा कालावधी हा अंतिम असेल व त्यानंतर कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही असेही शासन निर्णयात नमुद आहे.

**जात वैधता पडताळणी समिती स्थिती गंभीर त्यावर सुद्धा निर्णय होणे गरजेचे**

महाराष्ट्र राज्यात जात वैधता पडताळणी समित्या बाबत विचार करता एकुण ३६ पैकी १४ ठिकाणी अध्यक्ष असुन उर्वरित ठिकाणी प्रभारी अध्यक्ष आहेत.याचा परीणाम शासकीय यंत्रणेवर होत आहे आणि परिणामत: जातवैधता प्रमाणपत्रे विहीत वेळेत उपलब्ध होत नाही त्या मुळे राज्य भारातील सध्याच्या प्रवेश प्रक्रियेत एसईबीसी प्रमाणेच ओबीसी (कुणबी) व इतर विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाण पत्रासाठी अर्ज केलेल्या पोहोच पावती फक्त प्रवेशाच्या अंतिम तारखेपर्यंतच मान्यता गृहीत धरण्यात येते परंतु अंतिम दिनांकपर्यंत म्हणजे कट ऑफ डेट रोजी जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास प्रवेश आपोआप रद्द होतो यामुळे असंख्य विद्यार्थी आरक्षण व सवलती च्या लाभा पासून वंचित राहत असुन या वर गांभीर्याने निर्णय होणे गरजेचे असल्याचेही जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी नमुद केले.

# प्रधानमंत्री गतिशक्ती राष्ट्रीय बृहद आराखडा; जिल्ह्यातील यंत्रणा प्रमुखांचे प्रशिक्षण

## नियोजन व मूल्यमापनासाठी प्रशिक्षण आवश्यक-विभागीय आयुक्त दिलीप गावडे





**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जिल्ह्यात होत असलेले व होऊ घातलेले मोठ्या गुंतवणूकीचे पायाभुत सुविधा प्रकल्प कार्यान्वित करतांना प्रकल्पाचे नियोजन व प्रगतीचे मूल्यमापन होणे आवश्यक आहे. त्यात अचूकता व गतिमानता येण्यासाठी प्रधानमंत्री गतिशक्ती राष्ट्रीय बृहद आराखडा या पोर्टलवरील माहितीचा उपयोग होणार आहे, त्यासाठी दिल्या जात असलेल्या प्रशिक्षणाचा सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांनी लाभ घ्यावा,असे निर्देश विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी आज जिल्ह्यातील यंत्रणा प्रमुखांना दिले.

पायाभूत सुविधांशी निगडीत मोठे प्रकल्प कार्यान्वित करतांना प्रशासकीय प्रक्रियांची पूर्तता व प्रगतीची तपासणी, विविध विभागांमार्फत करावयाच्या उपाययोजनांचे अभिसरण याप्रक्रिया ऑनलाईन करणे व देखरेख करणे यासाठी प्रधानमंत्री गतिशक्ती राष्ट्रीय बृहद आराखडा ( पोर्टल तयार करण्यात आले असून या पोर्टलवर करावयाच्या कामकाजाविषयी आज एमआयटी संस्थेत यंत्रणाप्रमुखांचे प्रशिक्षण घेण्यात आले. एमआयटी महाविद्यालयाच्या सभागृहात हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. प्रथम सत्रात माहिती व द्वितीय सत्रात प्रत्यक्ष प्रात्यक्षिक देऊन प्रशिक्षण देण्यात आले. जिल्ह्यातील विभागांचे यंत्रणाप्रमुख व कर्मचारी असे १२० जण याप्रशिक्षणात सहभागी झाले. प्रशिक्षणाचे उद्घाटन विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्या हस्ते करण्यात आले. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, ‘वाल्मि’संस्थेचे आयुक्त प्रकाश खपले, उपायुक्त विजय पवार, महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्रा (शैएँण)मार्फत आलेले तज्ज्ञ प्रशिक्षक डॉ. संजीव वर्मा व डॉ. श्रीमती टुटू सेनगुप्ता, जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी म्हणाले की, या पोर्टलद्वारे सगळे कामकाज आता ऑनलाईन होणार असून प्रशासकीय कामाचा वेळ वाचणार आहे. एखादा प्रकल्प राबवितांना त्यात अनेक विभागांचा सहभाग व समन्वय असतो. अशावेळी प्रत्येक विभागाकडून प्रकल्पासाठी करावयाची पूर्तता विहित वेळेत होणे आवश्यक आहे. अशा सर्व संबंधित विभागांनी प्रकल्पासाठी आपापल्या विभागामार्फत केलेल्या कामकाजाच्या प्रगतीची माहिती पोर्टल वर अपलोड करणे आवश्यक आहे. जेणेकरुन वरिष्ठ पातळीवर कामाच्या प्रगतीचे अवलोकन करता येऊ शकेल. या प्रशिक्षणामुळे कामकाजात गतिमानता व अचुकता येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. विभागीय आयुक्त दिलीप गावडे म्हणाले की, पायाभुत सुविधांचे मोठ्या प्रकल्पांच्या उभारणीत अनेक विभागांचा समन्वय असतो. त्या प्रकल्पांचे नियोजन व कार्यान्वियन करण्यासाठी या पोर्टलवर भरावयाच्या माहितीचा उपयोग होणार आहे. त्यासाठी हे प्रशिक्षण देण्यात येत आहे.

प्राथमिक, द्वितीय आणि तृतीय क्षेत्रातील गुंतवणूक करतांना या बाबींचा विचार होणे आवश्यक असते. त्यासाठी जिल्ह्यातील प्रकल्पांची माहिती वेळेत व अचूक सादर करावयाची आहे. प्रशासनाला अचूकता व गतिमानता येण्यासाठी या पोर्टलचा उपयोग होणार असून प्रशासन व शासनस्तराच्या उच्च पातळीवर या माहितीचे अवलोकन एका क्लिकवर होऊ शकेल. या प्रशिक्षणाचा सर्व अधिकारी कर्मचारी यांनी लाभ घ्यावा, असे त्यांनी सांगितले.

# जायकवाडीतील पाणी कपाती अहवालाचा फेरविचार करावा

## आमदार सतीश चव्हाण यांची मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांकडे मागणी

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**


जायकवाडी धरणातील पाणी कपातीची शिफारस महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्थेने (मेरी) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाकडे केली आहे. या अहवालाचा फेरविचार करण्याची मागणी मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे आमदार सतीश चव्हाण यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे निवेदनाव्दारे केली आहे.

यासंदर्भात आमदार सतीश चव्हाण यांनी आज दि.१६ मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सन २०१३ मध्ये नियुक्त केलेल्या मेंढेगिरी समितीने सादर केलेल्या अहवालाच्या आधारे समन्यायी पाणी वाटप कायदा करण्यात आला. त्यानुसार ३१ ऑक्टोबरपर्यंत जायकवाडी धरणात ६५ टक्के पाणीसाठी झाला नाही तर अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्यातील धरणातून पाणी सोडावे अशी तरतूद करण्यात आली होती. मात्र आता ‘मेरी’ संस्थेने मेंढेगिरी समितीने निश्चित केलेल्या पाणीवाटप सूत्रात बदल सुचवत ६५ टक्के जलसाठ्याची अट सात टक्क्यांनी घटवून ५८ टक्के करण्याची केलेली शिफारस मराठवाड्याच्या जनतेवर अन्याय करणारी आहे. खरे तर कायम दुष्काळग्रस्त म्हणून ओळखल्या जार्णाया मराठवाड्याला कुठलीच गोष्ट सहजासहजी मिळत नाही. यासाठी आम्हाला नेहमी संघर्ष करावा लागतो. त्यात आता मराठवाड्याच्या हक्काच्या मिळर्णाया पाण्यात सात टक्के कपात करणारी बाब मराठवाड्यातील लाखो जनतेच्या जखमेवर मीठ चोळणारी आहे.

जायकवाडीच्या वरच्या भागात बिगर सिंचन पाणी वापर वाढला आहे. पिण्याच्या पाण्याची आणि उद्योगांची मागणी वाढत चालली आहे. पाण्याचा वाढलेला वापर, लोकसंख्या आणि त्यानुसार पिण्याच्या पाण्याची आणि उद्योगांची मागणी लक्षात घेऊन ही शिफ्फारस केल्याचे ‘मेरी’ संस्थेचे म्हणणे आहे. मात्र पाणी कपातीची शिफ्फार करताना ‘मेरी’ संस्थेला मराठवाड्याच्या गरजेचा विचार करावासा वाटला नाही का?, मराठवाड्यात या दहा वर्षात नवीन जलस्त्रोत निर्माण झाले का?, मराठवाड्यातील दुष्काळ कायमचा संपला आहे का?, मराठवाड्यात पिण्याच्या पाण्याची आणि उद्योगांसाठी लागर्णाया पाण्याची मागणी नाही का?, मराठवाडा महाराष्ट्रात नाही का?, नेमके काय घडले जेणेकरून मराठवाड्याच्या हक्काचे ७ टक्के पाणी ‘मेरी’ला नगर-नाशिकसाठी अधिकचे आरक्षित करावे वाटले असा प्रश्न आमदार सतीश चव्हाण यांनी उपस्थित केला आहे.

मराठवाड्यात रोज शेतकरी आत्महत्या होत आहेत. शेतीस सिंचनासाठी पाण्याचा अभाव हे याचे प्रमुख कारण आहे. अशावेळेस ऊर्ध्व भागातील जलस्त्रोतांचे अधिकचे वापरातील पाणी मराठवाड्यात सोडून या भागाचा पाणी प्रश्न कायमचा सोडविण्या ऐवजी आमचे हक्काचे पाणी अडविण्याचा घाट शासकीय संस्था राजकीय दबावापोटी घालत असेल तर ते राज्याच्या समतोल विकासासाठी मारक आहे, ही बाब विचारात घेणे गरजेचे आहे. एकीकडे मराठवाड्यातील पाण्याचा दुष्काळ संपवण्यासाठी राज्य सरकारने पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी नदीजोड प्रकल्पाव्दारे मराठवाड्याला देण्याची योजना आखली असताना दुसरीकडे ‘मेरी’ संस्थेने मात्र दुष्काळग्रस्त मराठवाड्याचे हक्काचे पाणी पळवण्याचा घातलेला घाट अन्यायकारक असून समन्यायी पाणी वाटपाच्या सूत्रास हरताळ फ्फासणारा असल्याचे आमदार सतीश चव्हाण यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. मराठवाड्यासाठी पाण्याची गरज लक्षात घेता ‘मेरी’ संस्थेने महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाकडे सादर केलेल्या पाणी कपाती बाबतच्या अहवालाचा फ्फेरविचार करण्याची मागणी आमदार सतीश चव्हाण यांनी निवेदनाव्दारे केली आहे.

# नामविस्तार दिनानिमित्त महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षातर्फे अभिवादन...



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या ३१ व्या नामविस्तार दिनानिमित्त महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षातर्फे अभिवादन करण्यात आले यावेळेस सुभेदारी विश्रामगृह ते विद्यापीठ गेट अशी चारचाकी वाहन रॅली काढण्यात आली तेव्हा शेकडो चार चाकी वाहनांचा रॅलीमध्ये समावेश होता तसेच रॅली द्वारे कार्यकर्त्यांनी व पदाधिकाऱ्यांनी विद्यापीठ गेट समोरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून व मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतर लढ्यात आपल्या प्राणांची आहुती देणारे नामांतर शाहिद यांच्या स्मारकाला पुष्प चक्र अर्पण करून महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे संस्थापक अध्यक्ष संजयभैय्या सोनवणे यांच्या हस्ते अभिवादन केले. या रॅलीचे प्रमुख आकर्षण म्हणजे पक्षाचे संस्थापक अध्यक्ष संजयभैय्या सोनवणे होते व त्यांची या रॅलीला प्रमुख उपस्थिती होती. रॅलीचे नियोजन जिल्हाध्यक्ष राहुल वडमारे यांनी केले होते,रॅलीमध्ये पक्षाचे छत्रपती संभाजी नगर (औरंगाबाद) जिल्ह्यातील प्रत्येक तालुका व गावातून आलेल्या असंख्य कार्यकर्त्यांनी आपला सहभाग नोंदवला.

रॅलीच्या पूर्वी सुभेदारी विश्रामगृह येथे आयोजित पत्रकार परिषदेमध्ये पक्षाचे अध्यक्ष संजयभैय्या सोनवणे यांनी पत्रकारांशी वार्तालाप करताना सांगितले की नामविस्तार झाला म्हणजे सर्व काही संपले असे नाही, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाप्रमाणे विद्यापीठाचा कारभार चालला पाहिजे, विद्यार्थ्यांना सर्व सुख सुविधा मिळायला पाहिजेत व शिक्षणाचा दर्जा उंचावला गेला पाहिजे. मागील तीन वर्षापासून चालू असलेले नामांतर शहीद स्मारकाचे काम दर्जेदार व उच्च प्रतीचे झाले पाहिजे यासाठी आमचे जिल्हाप्रमुख आयु. राहुल वडमारे यांच्या नेतृत्वाखाली आम्ही लवकरच विद्यापीठ प्रशासनाची भेट घेणार असून त्यांच्याशी सविस्तर चर्चा करून या बाबी आम्ही त्यांच्या निदर्शनास आणून देणार आहोत आम्ही सत्ताधारी पक्षाबरोबर असल्याकारणाने काही अडचणी आल्यास आम्ही स्वतः उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याशी याबाबत चर्चा करणार असून येत्या नामविस्तार दिनापर्यंत शहीद स्मारकाचे काम पूर्ण झालेले आपणास दिसेल असेही त्यांनी सांगितले व विद्यापीठ परिसरात काम करत असलेल्या विद्यार्थी नेते, सामाजिक कार्यकर्ते विद्यार्थी यांच्यावर कूलगुरू व विद्यापीठ प्रशासना मार्फत जे गंभीर स्वरूपाचे गून्हे दाखल करण्यात आले आहे ते तात्काळ रद्द करण्यात आले पाहिजे असे सांगितले, याचबरोबर येणाऱ्या



स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये ही आपण महायुती बरोबर काही जागा लढवणार असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळेस मराठवाड्यातील पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र ही त्यांच्या हस्ते देण्यात आले या कार्यक्रमास जिल्हाध्यक्ष राहुल वडमारे, जिल्हा संघटक रतन जाधव, जिल्हा सचिव बापूसाहेब चाबुकस्वार, शहर उपाध्यक्ष संजय चव्हाण, युवा नेते तुषार भोसले, हिरालाल जयस्वाल, महादेव जानकर, बंडू तांदळे , महेंद्रजी जाधव, विकास भाऊ गायकवाड,संजय साबळे, राजेंद्र जाधव, पंकज भुतकर, राजेंद्र सोनवणे, शरद खरात, राहुल जाधव, विजय चाबुकस्वार, बाबासाहेब ससाने, महिला आघाडीच्या अलकाताई जाधव, स्वातीताई घुसळे, द्वारकाबाई कीर्तीशाई , केसरबाई दिवेकर ,यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते..

# प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना; जनजागृतीसाठी पाणलोट यात्रा

**पाणलोट यात्रा १४ गावांमध्ये नेण्यात येत आहे**

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

प्रधानमंत्री कृषीसिंचन योजनेअंतर्गत पाणलोट विकास घटक २.० प्रकल्प जिल्ह्यात ६५ गावांमध्ये राबविण्यात येत असून याद्वारे २२०२० हेक्टर क्षेत्र पाणलोट उपचाराखाली येणार आहे. या उपक्रमाबद्दल जनजागृती व लोकशिक्षण होण्यासाठी जिल्ह्यात पाणलोट यात्रा १४ गावांमध्ये नेण्यात येत आहे.

केंद्रीय भूसंसाधन विभाग, ग्रामीण विकास मंत्रालय भारत सरकार यांचे माफर्फत प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० या प्रकल्पाकरीता सामाईक मार्गदर्शक सूचना २०२१ निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्यास अनुसरुन प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना – पाणलोट विकास घटक २.० ही योजना राज्यात राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन घटकाअंतर्गत पाणलोट विकासाची कामे करण्यात येतात, तसेच उपजीविका उपक्रम, उत्पादन पद्धती



अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्यात येतो.

या योजनेची स्थानिक समुदायामध्ये जागरुकता निर्माण करुन जनजागृती करण्यासाठी, तसेच लोकसहभागातून योजनेच्या अंमलबजावणीला चालना देण्यासाठी केंद्र शासनामार्फत पाणलोट यात्रा सुरु करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत जिल्ह्यामध्ये एकूण ७ प्रकल्प आहेत. योजनेचे सदस्य सचिव जिल्हा जलसंधारण अधिकारी आहेत. तालुका खुलताबाद, पैठण, गंगापूर, वैजापूर, शिऊर हे प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून कृषी विभाग आहे. हा कार्यक्रम ६५ गावामध्ये सुरु असून या अंतर्गत ४३९३५ हेक्टर इतके भौगोलिक क्षेत्र, २२०२० हेक्टर इतके उपचार क्षेत्र आहे. पाणलोट यात्रेसाठी जिल्ह्यामध्ये १४ गावांची निवड करण्यात आली आहे.

या यात्रेद्वारे

१. प्रकल्प क्षेत्रातील स्थानिक नागरिकांना मोबाईल थिएटर व्हॅन द्वारे (तठ शुशीिळशपलश) पाणलोट कामाबाबत आभासी सहलींचा अनुभव देणे.

२. गावोगावी पाणलोट चळवळ निर्माण व्हावी, त्याअनुषंगाने हातात माती घेऊन मृद व जलसंरक्षण आणि संधारणाची शपथ घेणे. योजनेच्या प्रकल्प क्षेत्रातील नविन मृद व जलसंधारण कामांचे भूमिपूजन करणे.

३. योजनेच्या प्रकल्प क्षेत्रातील नविन मृद व जलसंधारण कामांचे भूमिपूजन करणे.

४. पाणलोट कामांवर श्रमदान करणे.

५. पाणलोट क्षेत्रात फळबाग लागवड करणे.

६. पाणलोट क्षेत्रातील पूर्ण झालेली मृद व जलसंधारण कामांची लोकार्पण करणे. आदी कामे करण्यात येणार आहेत, असे जिल्हा जलसंधारण अधिकारी नरेंद्र कटके यांनी कळविले आहे.

# 'कुटुंबाचा सामाजिक उपभोग : आरोग्य' सर्व्हेक्षण

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

सांख्यिकी आणि कार्यक्रम कार्यान्वयन मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून राष्ट्रीय नमूना पाहणी ८० वी फेरी 'कुटुंबाचा सामाजिक उपभोग:आरोग्य' या विषयावर देशव्यापी पाहणी घेण्यात येत आहे. पाहणी जानेवारी ते डिसेंबर २०२५ या कालावधीत घेण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्याकरीता अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग या पाहणीमध्ये सहभागी होत आहे.

या सर्वेक्षणाचा मुख्य उद्देश आरोग्य क्षेत्राविषयी मुलभूत सांख्यिकी माहिती निर्माण करणे, शासनाकडून पुरविण्यात येणाऱ्या आरोग्य सेवांचे मोजमाप करणे, सरकारी रुग्णालयांचा वापर किती प्रमाणात होतो, सरकारी व खासगी क्षेत्रातून मिळणाऱ्या उपचारांवर होणारा खर्च, लसीकरण तसेच १५ ते ४९ वयोगटातील गरोदर महिलांसाठी गर्भावस्थेच्या पूर्व आणि पश्चात घेतलेल्या उपचारांबाबत तपशिलवार माहिती या सर्वेक्षणाच्या माध्यमातून संकलित केली जाणार आहे. पाहणीची माहिती शाश्वत विकास ध्येय अंतर्गत महत्वाचे निर्देशक तयार करण्यासाठी आणि पाहणीचे निष्कर्ष केंद्र व राज्य शासनाला नियोजन व ध्येयधोरणे राबविण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे.

अर्थ व सांख्यिकी संचालनालयाचे प्रशिक्षित कर्मचारी या पाहणीकरीता माहिती गोळा करत आहेत. हे कर्मचारी शास्त्रोक्त पद्धतीने निवडलेल्या गावांना आणि शहरी भागांना भेट देतात. या भेटीदरम्यान सांख्यिकी पद्धतीचा वापर करुन निवडण्यात आलेल्या कुटुंबाकडून माहिती गोळा करण्यात येत आहे. पाहणी दरम्यान कुटुंबाची संकलित केलेली वैयक्तिक माहिती पूर्णपणे गोपनीय ठेवण्यात येणार आहे. या सर्वेक्षणासाठी येणाऱ्या कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे आणि त्यांना योग्य व परीपूर्ण माहिती देण्यासाठी वेळ द्यावा असे आवाहन अर्थ व सांख्यिकी संचालनालयाचे सहसंचालक प्रादेशिक कार्यालय म.श. दुशिंग यांनी केले आहे.

# मनपाच्या नवीन चार वाहनांचे लोकार्पण

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजी नगर महानगरपालिकेच्या वतीने नवीन चार वाहनांचे लोकार्पण आज करण्यात आले. आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या मार्गदर्शनाखाली नवीन ०३ जेसीबी ,०१ डिझेल ब्राऊझर व ०१ कोंडवाडा वाहन असे मिळून चार वाहनांचे लोकार्पण आज यांत्रिकी विभाग येथे करण्यात आले. यावेळी कार्यकारी अधिकारी (यांत्रिकी) अमोल कुलकर्णी,यांत्रिकी विभगाचे माजी कार्यकारी अभियंता डि.के.पंडित, यु.जी शिरसाट,जेसीबी कंपनीच्या वतीने प्रशांत चौधरी व यांत्रिकी विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

# बोअरवेल्स संदर्भात मार्गदर्शक सुचना जारी

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

संचालक आपत्ती व्यवस्थापन प्रभाग व राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्रतिसाद दलाच्या निर्देशानुसार बोअरवेल्स संदर्भात मार्गदर्शक सुचना जारी केल्या असून त्यासंदर्भात वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्व्हेक्षण विभाग यांना नोडल अधिकारी म्हणून नियुक्त केल्याचे आदेश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले आहेत.

**यासंदर्भात जारी केलेल्या मार्गदर्शक सुचना याप्रमाणे-**

१. उघड्या बोअरवेल यांना अनिवार्य सिल करणे, जेणेकरुन त्याठिकाणी जाण्यास मज्जाव होईल. यासाठी संबंधित जमीन मालक आणि ड्रिलिंग एजन्सी यांची जबाबदारी निश्चित करावी.

२. सर्व बोअरवेल्स यांच्या नोंदणीची प्रणाली स्थापन करणे.

३. उघड्या बोअरवेल संबंधी असलेली जोखीम व लहान मुलांची सुरक्षा याबाबत व्यापक जनजागृती मोहिम राबविणे.

४. बोअरवेल ऑपरेटर्स किंवा जमीन मालक यांनी बोअरवेलच्या सभोवताली सुरक्षेच्या अनुषंगाने अडथळे निर्माण करणे.

५. असुरक्षित बोअरवेल ओळखण्यासाठी व त्यासंबंधी निराकरण करण्यासाठी समुदाय संचलित यंत्रणा कार्यान्वित करणे.

६. सर्वोच्च न्यायालय यांनी जारी केल्याप्रमाणे बोअरवेल सुरक्षा नियमांचे उल्लंघन केल्यास संबंधिताकडून कठोर दंड आकारणी करणे.

७. सुरक्षा नियमांचे पालन होते किंवा कसे याबाबत खात्री करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांची नियमित तपासणी करणे.

८. संबंधित अधिकाऱ्यांनी सुरक्षा नियमांचे पालन होत आहे याबाबतची खातरजमा करण्यासाठी नियमित तपासणी करणे. यासुचनांची व आदेशाची अवज्ञा झाल्यास आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम ५१ अन्वये कोणतीही व्यक्ती संस्था, अथवा समूह यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल असे निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण विनोद खिरोळकर यांनी कळविले.

# प्रधानमंत्री गतिशक्ती राष्ट्रीय बृहद आराखडा; जिल्ह्यातील यंत्रणा प्रमुखांचे प्रशिक्षण

# नियोजन व मूल्यमापनासाठी प्रशिक्षण आवश्यक- विभागीय आयुक्त दिलीप गावडे

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जिल्ह्यात होत असलेले व होऊ घातलेले मोठ्या गुंतवणूकीचे पायाभुत सुविधा प्रकल्प कार्यान्वित करतांना प्रकल्पाचे नियोजन व प्रगतीचे मूल्यमापन होणे आवश्यक आहे. त्यात अचूकता व गतिमानता येण्यासाठी प्रधानमंत्री गतिशक्ती राष्ट्रीय बृहद आराखडा या पोर्टलवरील माहितीचा उपयोग होणार आहे, त्यासाठी दिल्या जात असलेल्या प्रशिक्षणाचा सर्व अधिकारी- कर्मचाऱ्यांनी लाभ घ्यावा,असे निर्देश विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी आज जिल्ह्यातील यंत्रणा प्रमुखांना दिले.

पायाभूत सुविधांशी निगडीत मोठे प्रकल्प कार्यान्वित करतांना प्रशासकीय प्रक्रियांची पूर्तता व प्रगतीची तपासणी, विविध विभागांमार्फत करावयाच्या उपाययोजनांचे अभिसरण याप्रक्रिया ऑनलाईन करणे व देखरेख करणे यासाठी प्रधानमंत्री गतिशक्ती राष्ट्रीय बृहद आराखडा (PM Gati ShaktiNationa Master Plan) पोर्टल तयार करण्यात आले असून या पोर्टलवर करावयाच्या कामकाजाविषयी आज एमआयटी संस्थेत यंत्रणाप्रमुखांचे प्रशिक्षण घेण्यात आले. एमआयटी महाविद्यालयाच्या सभागृहात हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. प्रथम सत्रात माहिती व द्वितीय सत्रात प्रत्यक्ष प्रात्यक्षिक देऊन प्रशिक्षण देण्यात आले. जिल्ह्यातील विभागांचे



यंत्रणाप्रमुख व कर्मचारी असे १२० जण याप्रशिक्षणात सहभागी झाले. प्रशिक्षणाचे उद्घाटन विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्या हस्ते करण्यात आले. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, 'वाल्मि'संस्थेचे आयुक्त प्रकाश खपले, उपायुक्त विजय पवार, महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्रा (MRSAC) मार्फत आलेले तज्ज्ञ प्रशिक्षक डॉ. संजीव वर्मा व डॉ. श्रीमती टुटू सेनगुप्ता, जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ आदी उपस्थित होते.

**कामकाजात येणार अचूकता आणि गतिमानता- जिल्हाधिकारी स्वामी**

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी म्हणाले की, या पोर्टलद्वारे सगळे कामकाज आता ऑनलाईन होणार असून प्रशासकीय कामाचा वेळ वाचणार आहे. एखादा प्रकल्प राबवितांना त्यात अनेक विभागांचा सहभाग व समन्वय असतो. अशावेळी प्रत्येक विभागाकडून प्रकल्पासाठी करावयाची पूर्तता विहित वेळेत होणे आवश्यक आहे. अशा सर्व संबंधित विभागांनी प्रकल्पासाठी आपापल्या विभागामार्फत केलेल्या कामकाजाच्या प्रगतीची माहिती पोर्टलवर अपलोड करणे आवश्यक आहे. जेणेकरुन वरिष्ठ पातळीवर कामाच्या प्रगतीचे अवलोकन करता येऊ शकेल. या प्रशिक्षणामुळे कामकाजात गतिमानता व अचुकता येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**नियोजन व मूल्यमापनासाठी प्रशिक्षण उपयुक्त-विभागीय आयुक्त गावडे**

विभागीय आयुक्त दिलीप गावडे म्हणाले की, पायाभुत सुविधांचे मोठ्या प्रकल्पांच्या उभारणीत अनेक विभागांचा समन्वय असतो. त्या प्रकल्पांचे नियोजन व कार्यान्वयन करण्यासाठी या पोर्टलवर भरावयाच्या माहितीचा उपयोग होणार आहे. त्यासाठी हे प्रशिक्षण देण्यात येत आहे.प्राथमिक, द्वितीय आणि तृतीय क्षेत्रातील गुंतवणूक करतांना या बाबींचा विचार होणे आवश्यक असते. त्यासाठी जिल्ह्यातील प्रकल्पांची माहिती वेळेत व अचूक सादर करावयाची आहे. प्रशासनाला अचूकता व गतिमानता येण्यासाठी या पोर्टलचा उपयोग होणार असून प्रशासन व शासनस्तराच्या उच्च पातळीवर या माहितीचे अवलोकन एका क्लिकवर होऊ शकेल. या प्रशिक्षणाचा सर्व अधिकारी कर्मचारी यांनी लाभ घ्यावा, असे त्यांनी सांगितले.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४३१००५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४३१००३ येथे प्रसिध्द केले.

• **संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • RNI No. MAHMAR/2023/87816

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• **Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • RNI No. MAHMAR/2023/87816